**नियमित दिवाणी दावा क्र.४१/२०१० मधील नि.१३३ वरील आदेश**

**( पारीत दिनांक ३०.०१.२०१८)**

**(मगबूल इनामदार वि. मुस्तफा इनामदार)**

प्रस्तुतचा अर्ज वादी वारसांतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २२ नियम ३ अन्वये वारस रेकॉर्डवर घेणेसाठी व दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

०२. **अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** :—

सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द वाटपासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतचे प्रकरण प्रलंबीत असताना यातील वादी क्रं.१ हे दि. ११/०४/२०१७ रोजी मयत झाले आहेत. सदर मयत वादी क्रं.१ चे वारस दाव्याचेकामी सामील करणे आवश्यक आहे. तरी परिच्छेद कलम २ मध्ये वंशावळीमध्ये वादी क्रं.१ 'मगबूल' या नावापुढे 'मयत' असे लिहुन त्यांचेखाली अर्जात नमुद केलेप्रमाणे त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस व तशी दुरुस्ती करणेस परवानगी देणेत यावी. तसेच परिच्छेद क्रं.२ नंतर '२अ' ची दुरुस्ती अर्जात नमुद केलेप्रमाणे करणेत यावी.

०३. सदरील दुरुस्ती ही मुदतीत मागितलेली आहे. तसेच ती तांत्रिक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही अगर दाव्याच्या कामी कोणतीही विसंगत मागणी निर्माण होत नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली.

०४. प्रतिवादी यांनी प्रस्तुतच्या अर्जावर म्हणणे देवुन सदरचा अर्ज मुदतीत असल्याने योग्य ते हुकूम करणेबाबतचे कथन केले.

०५. अर्ज व त्यावरील शपथपत्राचे अवलोकन करुन तसेच वादी व प्रतिवादी यांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकून असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा

हा वादीने प्रतिवादींविरुध्द वाटपासाठी दाखल केलेला आहे. वादींनी मागणी केलेली दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्ती केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सदर दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी व वादी, प्रतिवादीमधील वादाचे कायमचे निराकरण होण्यासाठी मदत होणार आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्जात मागितलेली दुरूस्ती करण्यास परवानगी देणे उचित आहे. सबब मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी नि.१३३ वरील अर्जात मागितलेली दुरूस्ती आदेश तारखेपासून १४ दिवसांमध्ये करावी.

३. वादींनी खर्चाची रक्कम रूपये ३००/— (र.रु.तिनशे रूपये फक्त) प्रतिवादी यांना दयावेत.

**वाई**
**दिनांक ३०/०१/२०१८**

**(रोहिणी का.थोरात)**
**दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**वाई, जि.सातारा.**